प्रेस नोट – स्वस्थ नारी सशक्त परिवार, अभियान

मा. पंतप्रधान भारत सरकार यांचे मार्गदर्शनाखाली आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार तर्फे **"स्वस्थ नारी सशक्त परिवार"** अभियान दि. १७/०९/२०२५ ते दि. ०२/१०/२०२५ या कालावधीत सकाळी १० ते दुपारी ४ वाजेपर्यंत राबविण्यात येत आहे. सदर अभियाना अंतर्गत पुणे महानगरपालिकेच्या सर्व रुग्णालये , युपीएचसी, आयुष्यमान आरोग्य मंदिर, हिंदूहृदयसम्राट बाळसाहेब ठाकरे आपला दवाखाना स्तरावर जनजागृती व तपासणी शिबिरे आयोजित करण्यात येत आहेत. सदर अभियानात प्रामुख्याने किशोरवयीन मुली, गरोदर माता, स्तनदा माता व महिलांच्या आरोग्य विषयक सर्व तपासण्या करून रुग्णांवर आवश्यक पुढील उपचार करण्यात येणार आहेत.

यामध्ये महिलांची असंसर्गजन्य आजार, क्षयरोग, पोषण,समुपदेशन, बालकांचे लसीकरण इत्यादी तपासणी करण्याकरिता जवळच्या पुणे मनपा च्या रुग्णालये / दवाखान्याशी संपर्क साधावा. त्याचप्रमाणे शासनाच्या विविध आरोग्य विषयक योजना व रोग प्रतिबंधक उपाययोजना याबाबत जनजागृती करण्यात येणार आहे. या अभियानात सर्व प्रसूतिगृहे पुणे मनपा या ठिकाणी महाआरोग्य शिबीराचे नियोजन करण्यात येणार आहे. या शिबिरामध्ये स्त्रीरोग तज्ञ, बालरोग तज्ञ, नेत्ररोग तज्ञ, कान-नाक-घसा तज्ञ, दंत चिकित्सक, त्वचारोग तज्ञ, मानसोपचार तज्ञ, अस्थिरोग तज्ञ, फिजीशीयन, फिजीओथेरीपिस्ट इत्यादी तज्ञांचा समावेश करून महिलांना आरोग्य विषयक तज्ञ सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. तसेच सर्व युपीएचसी,आयुष्मान आरोग्य मंदिर व हिंदूहृदयसम्राट बाळसाहेब ठाकरे आपला दवाखाना यांच्यामार्फत प्रत्येक आठवड्याला २ शिबिरे घेण्यात येणार असून सदर आरोग्य संस्थेमध्ये येणाऱ्या नागरिक व रुग्णांची **प्राथमिक आरोग्य तपासणी** करून आवश्यकता असल्यास त्यांना पुढील उपचारासाठी नजीकच्या प्रसुतीगृहाकडे संदर्भित करण्यात येणार आहे.अशी माहिती डॉ.निना बोराडे आरोग्य अधिकारी, पुणे महानगरपालिका यांनी दिली.

किशोरवयीन मुली,गरोदर महिला,स्तनदा माता, महिला आणि बालके यांनी अधिकाधिक प्रमाणात या शिबिरात भाग घेऊन लाभ घ्यावा असे आवाहन श्री नवल किशोर राम आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी केले. तसेच सोबत येताना नागरिकांनी आधर कार्ड व रेशन कार्ड घेऊन यावे जेणेकरून नागरिकांना (आभा कार्ड) तसेच प्रधानमंत्री जन आरोग्य योजना या योजनांचे कार्ड काढून देण्यात येतील.

त्याचप्रमाणे चतुश्रृंगी देवी मंदिर, तांबडी जोगेश्वरी मंदिर व भवानी माता मंदिर इत्यादी ठिकाणी नवरात्र काळात महिलांची प्राथमिक आरोग्य तपासणी करणे करिता सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत विशेष शिबीर आयोजित करण्यात येणार आहे. अशी माहिती एम.जे. प्रदीपचंद्रन अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी दिली आहे.

या शिबिरा करिता आरोग्य विभाग पुणे महानगरपालिका याच्या कडून मनुष्यबळ,औषधे साधन सामग्री याची पूर्व तयारी डॉ.वैशाली जाधव व डॉ.मनिषा विनोद नाईक सहाय्यक आरोग्य अधिकारी पुणे महानगरपालिका यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे, शिबिराचे काटेकोर नियोजन करण्याबाबत परिमंडळ व क्षेत्रिय वैद्यकीय अधिकारी यांना निर्देश देण्यात आले आहे.

तज्ञ शिबिरामध्ये खालीलप्रमाणे सेवा देण्यात येणार आहेत त्यामध्ये,

१) महिलांची एनसीडी तपासणी:- उच्च रक्तदाब, मधुमेह ,तोंडाचा कर्करोग,स्तनाचा कर्करोग,आणि गर्भाशयाच्या मुखाची कर्करोग तपासणी.

२) असुरक्षित महिलांसाठी क्षयरोग तपासणी.

३) किशोरवयीन मुली आणि महिलांसाठी अशक्तपणाची तपासणी व समुपदेशन सेवा तसेच मासिक पाळी व स्वच्छता आणि पोषण यावर जागरूकता सत्र.

४) गर्भवती महिलांसाठी प्रसुतीपूर्व काळजी (एएनसी) तपासणी ज्यामध्ये हिमोग्लोबिन पातळीची चाचणी, गर्भधारणेदरम्यान पोषण आणि काळजी यावर समुपदेशन आणि माता आणि बाल संरक्षण (एमसीपी) कार्डचे वितरण.

५) बालकांना लसीकरण सेवा प्रदान करण्यात येणार आहे .

६) पोषण समुपदेशन आणि कल्याणसत्र,रक्तदान मोहीम,पीएमजेएवाय अंतर्गत नोदणी / आयुष्मान वय वंदना कार्ड चे वितरण , निक्षयमित्र स्वयंसेवकांची नोंदणी.

शिबिराच्या तारखा व ठिकाणे

१७/०९/२०२५ व २५/०९/२०२५- कमला नेहरू रुग्णालय(मंगळवार पेठ) , कै. जयाबाई सुतार रुग्णालय(कोथरूड), भारतरत्न. राजीव गांधी रुग्णालय (येरवडा)

१८/०९/२०२५ व २६/०९/२०२५- डॉ. दळवी प्रसुतीगृह (शिवाजीनगर), डॉ. होमी भाभा रुग्णालय (पांडवनगर), छ.शिवराय रुग्णालय(नागपूर चाळ)

१९/०९/२०२५ व २७/०९/२०२५- औंध कुटी रुग्णालय (औंधगाव), कै. द्रौपदाबाई मुरलीधर खेडेकर रुग्णालय (बोपोडी), कै. सहदेव एकनाथ निम्हण रुग्णालय (पाषाण)

२०/०९/२०२५ व २९/०९/२०२५- राजमाता जिजाऊ प्रसुतीगृह (मित्र मंडळ चौक), मातोश्री रमाबाई आंबेडकर प्रसूतिगृह (अंबिल ओढा), कै सावित्रीबाई फुले प्रसूतिगृह (गुरवार पेठ)

२२/०९/२०२५ व ३०/०९/२०२५- कै. अण्णासाहेब मगर प्रसूतिगृह (हडपसर), कै. मीनाताई ठाकरे प्रसूतिगृह (कोंढवा), कै. नामदेव गेनुजी शिवरकर प्रसूतिगृह (वानवडी)

२३/०९/२०२५ व ०१/१०/२०२५- कै. सखाराम कुंडलिक कोद्रे (मुंढवा), कै. मालती काची प्रसूतिगृह (गाडीखाना), कै. चंदुमामा सोनवणे प्रसूतिगृह (भवानी पेठ)

२४/०९/२०२५ व ०२/१०/२०२५- कै. काशिनाथ अनाजी धनकवडे दवाखाना (बालाजीनगर)

(डॉ. निना बोराडे)
आरोग्य अधिकारी
पुणे महानगरपालिका